N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** जेल रोड **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0321 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/06/2022 16:19 वाजे

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 10/06/2022
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/06/2022
   **Time Period (कालावधी):** पहर 6 **Time From (वेळेपासून):** 17:35 वजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 18:56 वजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/06/2022 **Time (वेळ):** 15:30 वजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 029 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/06/2022 16:19 वजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** आग्नेय

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** जेलरोड पोलीस स्टेशन आवार ,सोलापुर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्रीनिवास चंद्रकांत कोर्पोली

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| **S.No.(अ.** | **Id Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **Id Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 34/5,ब न्यु पाच्छापेठ, अशोक चौक,कोठे शाळेच्या पाठीमागे, ,सोलापुर,जेल रोड,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 34/5,ब न्यु पाच्छापेठ, अशोक चौक,कोठे शाळेच्या पाठीमागे, ,सोलापुर,जेल रोड,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-7385336462

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रवींद्र गणपत शिंदे | | वडील का नाम : गणपत शिंदे | 1. 59, स्वामी विवेकानंद नगर विजापुर , सोलापुर,विजापुर नाका,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | सलाहुद्दीन लायक अली मुल्ला | | वडील का नाम : लायक अली मुल्ला | 1. 35A,अ आनंद नर आयटीआय कलेज जवळ ,सोलापुर,विजापुर नाका,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दि. 27/06/2022 मी श्रीनिवास चंद्रकांत कोपेल्ली, वय 27 वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा. 34/5, ब न्यु पाच्छापेठ, अशोक चौक, कोठे शाळेच्या पाठीमागे, सोलापूर, मो.क्रं. 7385336462, समक्ष फिर्यादी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास असुन सध्या मी हैद्राबाद येथील साईन्ट प्रायव्हेट कंपनी मध्ये डीझाईन इंजिनिअर या पदावर नोकरीस आहे. व सध्या हैद्राबाद येथे असलेल्या माझ्या मित्राच्या रुमवर राहत असुन सोलापूर येथे येवुन जावुन करीत असतोमाझी कंपनी ही विदेशी असल्याने सदर कंपनी कडुन मला भविष्यात विदेशामध्ये नोकरी करण्याची संधी मिळु शकते त्याकरीता भारतीय पासपोर्ट असणे आवश्यक आहे. मी हैद्राबाद येथे मित्राच्या रुमवर राहत असल्याने त्याच्या पत्त्यावरुन मला पासपोर्ट काढणे शक्य नसल्याने तसेच माझा माझा मुळ पत्ता हा सोलापूर येथील असल्याने मी सोलापूर पासपोर्ट ऑफिस येथे पासपोर्ट मिळणेकरीता सर्व कागदपत्रांसह ऑनलाईन अर्ज सादर केला होता. सदर अर्ज मंजुर होवुन माझा पत्ता तसेच इतर पडताळणी करीता सदरचा अर्ज जेलरोड पोलीस स्टेशन, सोलापूर शहर येथे आला असल्याबाबत मला मोबाईल संदेशाद्वारे समजले त्याअनुषंगाने मी जेलरोड पोलीस स्टेशन येथे जावुन पासपोट व्हेरीफिकेशनचे काम करणारे पोलीस हवालदार शिंदे यांना जावुन भेटुन माझ्या पासपोर्ट बाबत तसेच त्यास जोडलेल्या कागदपत्रांबाबत सांगीतले असता त्यांनी माझ्या पासपोर्ट च्या अनुषंगाने माझा पत्ता पडताळणी करण्याकरीता तसेच योग्य असा शेरा देण्याकरीता माझ्याकडे 5000/- रुपयांची मागणी केली. त्यावर मी त्यांना पासपोर्ट करीता 5000/- रुपये जास्त होतात तसेच सध्या माझ्याकडे काहीच पैसे नाहीत असे सांगीतले असता त्यांनी मला ठिक आहे तुझ्या घरी व्हेरीफिकेशन करीता माणुस येईल त्यानंतर तु 2000/- रुपये घेवुन ये असे म्हणुन सदरचे पैसे घेवुन मला दि. 10/06/2022 रोजी भेटण्याकरीता येण्यास सांगीतले. पासपोर्ट च्या अनुषंगाने होणारे पोलीस व्हेरीफिकेशन तसेच राहण्याचे ठिकाणाची पडताळणी करण्याकरीता कोणतीही शासकीय फी नसुन कोणालाही कोणतीही रक्कम द्यावी लागत नाही याबाबत माझी खात्री असुन जेलरोड पोलीस स्टेशन येथील पोलीस हवालदार शिंदे माझ्याकडे मागणी करीत असलेले 2000/- रुपये हे लाचेची रक्कम असल्याची माझी खात्री असुन माझी पोलीस हवालदार शिंदे यांना कोणतीही लाच देण्याची अजिबात इच्छा नाही. माझा व नमुद पोलीस हवालदार शिंदे यांचेशी यापुर्वीचा कोणताही वाद विवाद तसेच पैशाच्या देवाणघेवाणीचा कोणताही व्यवहार प्रलंबित नसुन मला त्यांना लाच स्वरुपात कोणतीही रक्कम द्यायची इच्छा नाही. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई होणेकरीता मी अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर कार्यालयात दि. 10/06/2022 रोजी येवून तेथे श्री. उमाकांत महाडिक, पोलीस निरीक्षक यांच्या समक्ष लेखी तक्रारी अर्ज दिला.सदर तक्रारी अर्जावर

महाडिक यांच्या सुचनेवरुन मी शिंदे यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडे असलेले 1500/- रुपये हजर केले. त्यात 500/- रूपये दराच्या 03 चलनी नोटा होत्या. पोनि महाडिक यांनी त्यांच्या अंमलदाराकरवी सदर नोटांचे क्रमांक कोऱ्या कागदावर लिहुन घेतले. व पोनि महाडिक व दोन्ही पंचानी सदरच्या नोटांचे नंबर पडताळणी करुन त्या कागदावर सह्या केल्या. त्यानंतर सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्याची, त्याचे प्रात्यक्षिक करण्याची कार्यवाही करुन सापळा कारवाई संबंधाने करावयाच्या कामाच्या सुचना अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातील पोनि महाडिक यांच्या समक्ष देण्यात आल्या. त्यानंतर ऐंथ्रासीन पावडर लावलेल्या लाचेच्या रक्कमाच्या नोटा माझे शर्टचे समोरील डावे खिशामध्ये ठेवण्यात आल्या.

त्यानंतर पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 नागेश शिंदे यांना आवश्यक सुचना देवुन पोलीस हवालदार शिंदे यांच्याविरुध्द जेलरोड पोलीस स्टेशन येथे लाचेचा सापळा आयोजीत केला. त्याअनुषंगाने पुन्हा माझ्या गळयात शर्टाच्या आतील बनियानचे आत व्हाईस रेकॉर्डर चालु करुन अडकविला व मी व पंच न 1 नागेश शिंदे असे दोघेजण माझ्या दुचाकी वाहनावरुन तसेच पोनि महाडिक पंच नं 2 व उर्वरीत सापळा पथक आमचे पाठीमागे त्यांच्या शासकीय वाहनातुन जेलरोड पोलीस स्टेशन येथे आले व सदर परिसर सापळा लावुन थांबले. तेथे मी, पंच नं 1 नागेश शिंदे असे पोलीस हवालदार शिंदे यांची समक्ष भेट घेण्याकरीता जेलरोड पोलीस स्टेशन येथे जावुन शिंदे बसतात त्या पासपोर्ट विभागाच्या खोली मध्ये पाहीले असता शिंदे तेथे होते. तेथे मी शिंदे यांना आत येवु का असे विचारले असता ये नको जा केलयं तुझ काम असे म्हणुन मला हातवारे करुन तेथुन निघुन जाण्यास सांगीतले. त्यामुळे मी व पंच नागेश शिंदे असे अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालयात परत आलो. आमच्या पाठोपाठ पोनि महाडिक व सापळा पथक देखील कार्यालयात परत आले. तेथे पोनि महाडिक यांनी माझ्या गळ्यातील व्हॉईस रेकॉर्डर काढून पंच नं.1 नागेश शिंदे व मला हकीकत विचारुन घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्तप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि महाडिक यांनी व पंचानी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये माझ्यात व पोलीस हवालदार शिंदे यांच्यात झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये शिंदे यांनी माझ्याकडे पासपोर्ट व्हेरीफिकेशनच्या अनुषंगाने यापुर्वी माझ्याकडे मागणी केलेली लाच रक्कम न स्विकारता मला तुझे काम झाले आहे असे म्हणुन तेथुन पाठवुन दिले असल्याचे निष्पन्न झाले.

सदर झालेल्या कारवाईदरम्यान शिंदे व मुल्ला यांच्या वर्तनुकीवरुन ते माझ्याकडे लाचेची रक्कम यापुढे स्विकारणार नाहीत याबाबत माझी खात्री झाली असुन माझ्या विनतीवरुन पोनि महाडिक यांनी सापळा कारवाई थांबुन सदर झाले कारवाईतील ध्वनिमुद्रीत संभाषणाचे उतारे काढुन घेवुन त्याबाबत सविस्तर पडताळणी, सपाळापुर्व व सापाळा पंचनामा केला. तसेच माझा जबाब नोंद करण्यात आला व मला, दोन्ही पंचांना तसेच सापाळा पथकाला झाले कारवाईबाबत गोपनियता राखण्याच्या सुचना योग्य त्या सुचना देण्यात आल्या.

दि. 10/06/2022 रोजी पोलीस हवालदार शिंदे यांचेविरुध्द दिलेल्या लाच मागणीच्या तक्रारीवरुन त्यांचेविरुध्द दि. 10/06/2022 रोजी पडताळणी कारवाई झाली असुन सदर पडताळणी कारवाईमध्ये पोलीस हवालदार शिंदे यांनी माझे पासपोर्ट व्हेरीफिकेशन तसेच पत्ता पडताळणी करुन योग्य शेरा देण्याकरीता 1500/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम 9371454772 या फोन पे मोबाईल धारक सलाउद्दीन मुल्ला यांच्या फोन पे अकाउटवर ट्रान्सफर करण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन दि. 11/06/2022 रोजी मुल्ला तसेच पोलीस हवालदार शिंदे यांच्यावर केलेल्या सापळा कारवाईमध्ये मुल्ला व शिंदे यांनी माझ्याकडुन लाचेच्या रक्कमेचा स्विकार केला नाही. परंतु दि. 10/06/2022 रोजीच्या पोलीस हवालदार शिंदे यांच्या झालेल्या पडताळणी कारवाईवरुन पोलीस हवालदार शिंदे व सलाउद्दीन मुल्ला यांच्यावर पुढील योग्य ती कारवाई करणे करीता नमुद प्रमाणे मी जबाब दिला असुन तो नोंद करण्यात आला आहे.

वरील कार्यवाही नंतर मी मला पैशाची मागणी करत असलेल्या पोलीस हवालदार शिंदे तसेच लाच रक्कम स्विकारणास संमती देणारे सलाउद्दीन मुल्ला यांचेबाबत दरम्यानचे काळात खात्री केली असता शिंदे यांचे संपुर्ण नांव श्री. रवींद्र गणपत शिंदे वर्षे, 57 पद- सहा. पोलीस उप-निरीक्षक, जेलरोड पोलीस स्टेशन, सोलापूर शहर रा. मु. पो. प्लॉट नंबर 59, स्वामी विवेकानंद नगर, विजापूर रोड, सोलापूर व मुल्ला यांचे संपुर्ण नांव श्री. सलाहुद्दीन लायक अली मुल्ला वर्षे, 46 व्यवसाय - टुर्स - ट्रव्हल्स, रा ब्लॉक नंबर 35/अ, आनंद नगर, आय. टी. आय कॉलेज जवळ, सोलापूर असे असल्याचे खात्री झाली आहे.

तरी दि. 10/06/2022 रोजी 17.35 वा ते 18.56 वा. दरम्यान रवींद्र गणपत शिंदे पद- सहा. पोलीस उप-निरीक्षक, जेलरोड पोलीस स्टेशन, यांनी माझे पासपोर्ट व्हेरीफिकेशन तसेच पत्ता पडताळणी करुन योग्य शेरा देण्याकरीता 1500/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम 9371454772 या फोन पे मोबाईल धारक सलाउद्दीन मुल्ला यांना फोन पे अकाउंटवर ट्रान्सफर करण्यास सांगीतले. व माझे समक्ष सलाउद्दीन मुल्ला यांना फोन करुन माझ्या कामाबाबत तसेच मी त्यांच्या फोन पे अकाउंटवर 1500/- रुपये ट्रान्सफर करणार असल्याबाबत सांगीतले असता सलाउद्दीन मुल्ला यांनी त्यास संमती देवुन बेकायदेशीररित्या स्वत:चा वैयक्तिक आर्थिक फायदा मिळविण्याच्या दृष्टीने स्वरूपाचे वर्तन केले आहे. यास्तव श्री. रवींद्र गणपत शिंदे पद- सहा. पोलीस उप-निरीक्षक, जेलरोड पोलीस स्टेशन, सोलापूर शहर व खाजगी इसम श्री. सलाहुद्दीन लायक अली मुल्ला, व्यवसाय - टुर्स - ट्रव्हल्स, यांचे विरूध्द माझी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम अन्वये कारवाई होणेबाबत फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कार्यालयातील संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यांनतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा जबाब दिला स.ता.म

समक्ष

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Japhar Nasarbaig Mogal(I (Inspector)) / POBN48013 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Japhar Nasarbaig Mogal
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN48013

Received FIR Copy